# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

**फुटाळा तलाव मार्ग, नागपूर — 440 001 (महाराष्ट्र राज्य)**

**संकेतस्थळ : www.mafsu.in/www.mafsu.ac.in**

## प्रवेश अधिसुचना — 2018—19

## पशुवैद्यकीय पदवी (बी.व्ही. एस्सी ॲण्ड ए.एच.) अभ्यासक्रम

पशुवैद्यकीय (बी.व्ही.एस्सी ॲण्ड ए.एच.) पदवी अभ्यासक्रमाच्या सन 2018—19 प्रवेशाकरीता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अभ्यासक्रमाची माहितीपुस्तिका व प्रवेश अर्ज विद्यापीठाचे संकेतस्थळ (www.mafsu.ac.in) वर दिनांक **20/06/2018** पासून उपलब्ध राहतील.

**शैक्षणिक पात्रता :**

पशुवैद्यकीय पदवी प्रवेशाकरीता उमेदवार 12 वी (10 + 2) परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञानशास्त्र आणि इंग्रजी विषयात एकत्रीतपणे अराखीव प्रवर्गाकरीता किमान 50% गुण व राखीव प्रवर्गाकरीता किमान 47.50% गुण घेवून उत्तीर्ण असणे आवश्यक असुन उमेदवाराने केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड (सी. बी. एस. ई.), नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणारी राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (युजी)—2018 दिलेली असणे अनिवार्य आहे.

**प्रवेश अर्ज शुल्क**

- प्रवेश अर्ज शुल्क अराखीव प्रवर्गाकरीता ₹1000/— व राखीव प्रवर्गाकरीता ₹700/— राहील. उमेदवाराने अर्जाचे शुल्क डेबीट कार्ड/क्रेडीट कार्ड/ इंटरनेट बॅकींग या द्वारे ऑनलाईन पध्दतीचा वापर करुनच भरावे.

**अर्ज करण्याची कार्यपध्दती :**

- उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.
- उमेदवाराने माहितीपुस्तीका काळजीपूर्वक वाचल्यानंतर अर्ज भरावा.
- उमेदवाराला ऑनलाईन प्रवेश अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळाद्वारे भरता येईल. ऑनलाईन अर्ज भरण्याची तारीख, प्रवेश शुल्क संबधीची माहिती व अर्ज सादर करण्याबाबतची माहिती उमेदवारांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीपुस्तीकेत देण्यात आलेली आहे.
- प्रमाणपत्राचे एका पेक्षा जास्त पेजेस असल्यास (उदा. एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झाल्यास 2 गुणपत्रीका, नॉन क्रिमीलीयर प्रमाणपत्र, इ.) त्याची एक PDF किंवा JPEG फाईल करुन अपलोड करावी.
- आवश्यक त्या संपूर्ण माहिती व प्रमाणपत्रांसह ऑनलाईन भरलेला अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक **29/06/2018** आहे.

**....2**

**महत्वाच्या सुचना :**

- ऑन लाईन अर्ज भरतांना उमेदवारांनी अपलोड केलेले प्रमाणपत्र स्पष्ट दिसत असल्याची खात्री करावी.

- उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज केले असल्यास, संपुर्ण माहितीसह नव्याने सादर केलेला अर्ज गुणवत्ता यादी साठी ग्राहय धरला जाईल.

- **प्रमाणपत्रांच्या त्रृटीचे फेर सादरीकरण** – उमेदवारांनी चुकीचे किंवा अपूर्ण दस्तावेज अपलोड केलेले असल्यास अशा उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल. या उमेदवारांना विद्यापीठाने निर्दिष्ट केलेल्या विहित तारखेच्या आत केवळ सूचित कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक राहील.

- ऑन लाईन अर्जात त्रृटीची पूर्तता करण्याच्या हेतुने दिलेल्या दिनांकानंतर कोणतेही अतिरीक्त प्रमाणपत्र स्विकारण्यात येणार नाही.
- प्रवेश अर्ज करण्यास काही मदत आवश्यक असल्यास संबधीत महाविद्यालयात कार्यालयीन वेळे दरम्यान **दुरध्वनी क्रमांक– पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर – 0712–256883** किंवा **पशुवैद्यकीय महाविद्यालय, मुंबई –022–24131180** किंवा **पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ –9420845614, 9420845615 व 9860444716** किंवा **पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी–02452–233375** किंवा **पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर – 02385–254714/256630** वर संपर्क करावा.

**दिनांक : 20/06/2018**

**कुलसचिव**